RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष ११, अंक १०७] शुक्रवार, डिसेंबर २६, २०२५/पौष ५, शके १९४७ [पृष्ठे २, किंमत : रुपये १२.००

**असाधारण क्रमांक २४४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

**शुद्धीपत्र**

क्रमांक ठामपा/मुख्या-१/निवि-३४/आयुक्त-५३०, दिनांक २६ डिसेंबर २०२५.

ज्याअर्थी, जा.क्र.ठामपा/मुख्या-१/निवि-३४/आयुक्त-४८४, दिनांक १८ डिसेंबर २०२५ नुसार मा. राज्य निवडणूक आयोगाने त्यांचे आदेश क्रमांक रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.८०/का-५,दिनांक १५ डिसेंबर २०२५ अन्वये निवडणुकीचा कार्यक्रम निश्चित करून तो अधिसूचित करणेबाबत निर्देश दिलेले होते.

त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची प्रकरण १ निवडणूक नियमाखालील नियम ८ अन्वये ठाणे महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक -२०२५ साठी प्रभाग क्र.१ ते ३३ च्या निवडणुकीसाठी निवडणूक कार्यक्रम व निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी व आचारसंहिता पथक प्रमुख यांचे नाव, हुद्दा व त्यांचे कार्यालयाचा पत्ता दि.१८ डिसेंबर २०२५ रोजीच्या **महाराष्ट्र शासन राजपत्र** असाधारण भाग २ मध्ये अधिसूचित केली आहे आणि ज्याअर्थी, सदर **राजपत्रात** दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

मी, सौरभ राव, महापालिका निवडणूक अधिकारी तथा आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे सदर राजपत्रातील दुरुस्तीसाठी खालीलप्रमाणे शुद्धीपत्र प्रसिद्ध करीत आहे.

मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नगरपरिषद प्रशासन शाखा यांचे आदेश क्र.नपप्र /कार्या-२/RO/AROनेमणूक/२०२५ दिनांक २३ डिसेंबर २०२५ अन्वये श्री. विपीन लोहकरे, तहसिलदार माणगाव तहसिल कार्यालय, माणगाव यांची सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी-१ म्हणून केलेली नियुक्ती रद्द करण्यात आली आहे.

**पूर्वीचा मजकूर**

श्री. विपीन लोहकरे, तहसिलदार (करमणूक), जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांची ठाणे महानगरपालिका प्रभाग क्र. २७ व २८ करीता सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी - १ म्हणून केलेली नियुक्ती करण्यात आली होती. सदर नियुक्ती रद्द करून त्यांना कार्यमुक्त करण्यात आले आहे.

**याऐवजी सुधारित दुरुस्त मजकूर वाचण्यात यावा.**

श्रीम. प्रिया जांभळे पाटील, तहसीलदार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई यांची आचारसंहिता पथकाकडे करण्यात आलेली नियुक्ती रद्द करून त्यांची ठाणे महानगरपालिका प्रभाग क्र. २७ व २८ करिता सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी-१ म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

**सौरभ राव (भा.प्र.से).,**
निवडणूक अधिकारी तथा
प्रशासक तथा महापालिका आयुक्त,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

ठिकाण : ठाणे,
दिनांक : २६ डिसेंबर २०२५.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.